**प्रेस नोट दिनांक २६/०६/२०१९**

**सराईत सोनसाखळी चोरीच्या गुन्हेगारास युनिट १, गुन्हे शाखेच्या टिमने जेरबंद करून सोनसाखळी चोरीचे ०२ गुन्हे केले उघड**

पुणे शहरातील सोनसाखळी चोरीच्या वाढत्या गुन्हयांना आळा घालण्यासाठी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाप्रमाणे युनिट १, गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी रेकॅर्डवरील गुन्हेगारांचा शोध घेत असतांना युनिट १ चे पोलीस हवा. बशीर सय्यद व प्रशांत गायकवाड यांना त्यांचे गुप्त बातमीदाराकडून बातमी मिळाली की, सोनसाखळी चोरीचे गुन्हे करणारा सराईत गुन्हेगार नामे वसीम सलीम पटेल, वय ३६ वर्ष, रा. स नं १३४, दांडेकर पुल, पर्वती पायथा, पुणे याने विश्रामबाग पोलीस स्टेशनच्या हद्दीत चेनचोरीचा गुन्हा केला आहे. तेव्हा त्यास श्रीरामपूर सब जेल, जि. अहमदनगर येथून ट्रासफर करून घेवून त्यास विश्रामबाग पोलीस ठाणे गु.र.नं. २०८/२०१९ भादविक. ३९२ ३४१, ३२३ मध्ये अटक करण्यात आली आहे. त्याचेकडे सखोल तपास केला असता त्याचेकडुन खालील चेनचोरीचे ०२ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

**१) विश्रामबाग पोलीस स्टेशन गुरनं २०८/१९ भादविक ३९२,३४१,३२३**

**२) समर्थ पोस्टे गुरनं ५९/१९ भादविक ३९२**

या दोन्ही गुन्हयांमध्ये **एकुण ३९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने** कि रु १,०५,०००/- रु चे व **गुन्हयात वापरलेली एक मोटार सायकल** कि.रु. ३५,०००/- असा **सर्व मिळून १,४०,०००/- चा माल जप्त करण्यात** आला आहे. सदरच्या सराईत गुन्हेगारावर या अगोदर पुणे, मुंबई, श्रीरामपूर या ठिकाणी एकुण २७ सोनसाखळी चोरीचे व शरीराविरुध्दचे गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई ही श्री. अशोक मोराळे साो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे. श्री समिर शेख, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अरुण वायकर, व श्री गजानन पवार, पो.उप.निरी. दिनेश पाटील, पो.हवा. बशीर सय्यद, रिजवान जिनेडी, प्रशांत गायकवाड, स.पो.फौज. बाबा चव्हाण, गजानन सोनुने, सुभाष पिंगळे, विजेसिंग वसावे, पो.हवा. योगेश जगताप,सुधाकर माने, प्रकाश लोखंडे, संजय बरकडे, अशोक माने,तुषार माळवदकर, अनिल घाडगे, अजय थोरात, श्रीकांत वाघवले, वैभव स्वामी, तुषार खडके, सचिन जाधव, उमेश काटे, यांनी केली आहे.